नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २९/०५/२०२६ (शुक्रवार )**

---

## नागपुर ग्रामीण जिल्हयात रेतीच्या अवैध तसेच क्षमतेपेक्षा जास्त वाहतूकीस प्रभावी प्रतिबंध घालण्यासाठी भिवापूर महसूल तपासणी चौकी येथे २४ तास (24X7) अत्याधुनिक पोर्टेबल वेट ब्रिज (Weigh Bridge) कार्यान्वित करण्यात आले.

**रेतीच्या अवैध विनापरवाना व क्षमतेपेक्षा जास्त वाहतुकीस प्रभावी आळा घालण्यासाठी तसेच रस्त्यांचे होणारे नुकसान व रस्ते अपघतांना प्रतिबंध घालण्याच्या उद्देशाने नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीस प्रशासन व महसूल विभागामार्फत संयुक्तपणे भिवापूर महसूल तपासणी चौकी येथे पोर्टेबल वेट ब्रिज (Weigh Bridge) कार्यान्वित करण्यात आले. नागपुर ग्रामीण जिल्हयात अचानकपणे कोणत्याही पोलीस स्टेशन हद्दीत अशा प्रकारे वेट ब्रिज (Weigh Bridge) द्वारे रेती वाहतुक करणाऱ्या वाहनांची तपासणी करण्यात येणार आहे.**

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात पोलीस स्टेशन भिवापूर अंतर्गत मौजा भिवापूर येथील महसूल तपासणी चौकी येथे अत्याधुनिक पोर्टेबल वेट ब्रिज (Weigh Bridge) बसविण्यात आला असून, दिनांक २९/०५/२०२६ पासून तो २४ तास कार्यान्वित करण्यात आला आहे. सदर उपक्रमात लावण्यात आलेल्या वेट ब्रिज (Weigh Bridge) द्वारे रेती वाहतूक करणाऱ्या प्रत्येक वाहनाचे वजन तपासण्यात येणार आहे. सदर ठिकाणी पोलीस आणि महसुल विभागाचे संयुक्त पथक २४ तास तैनात करण्यात आले असुन सातत्याने रेती वाहतुक करणाऱ्या वाहनांची तपासणी करण्यात येणार आहे. शासनाने निर्धारित केलेल्या क्षमतेपेक्षा अधिक रेती वाहतूक करणाऱ्या वाहनांवर तात्काळ दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे तसेच अवैधरित्या विनापरवाना रेतीची वाहतुक करणारे वाहने मिळुन आल्यास संबंधित वाहन जप्त करून फौजदारी कायदे,

महाराष्ट्र महसूल अधिनियम तसेच मोटार वाहन कायदयान्वये कठोर कारवाई करण्यात येईल. नमुद उपक्रमाद्वारे रस्त्यांचे होणारे नुकसान व अपघाताला प्रतिबंध घालण्यास मोठी मदत होणार आहे.

नागपुर ग्रामीण पोलीस दलातर्फे सर्व रेती घाट मालक, वाळू वाहतूकदार, वाहन मालक व चालक यांना आवाहन करण्यात येते की, शासनाने निश्चित केलेल्या क्षमतेनुसारच वाळूची वाहतूक करावी तसेच वैध परवाना व आवश्यक कागदपत्रे सोबत बाळगावीत, नियमांचे उल्लघंन करणाऱ्यांवर दंडात्मक तसेच फौजदारी करावाई करण्यात येईल.





# २० किलो २४५ ग्रॅम गांजा सह ४ लाख २४ हजार ४०० रूपयांचा मुद्देमाल जप्त, अवैधरित्या गांजा वाहतुक करणाऱ्या आरोपींविरूद्ध गुन्हा नोंद, ४ आरोपी अटक, नागपुर ग्रामीण पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन सावनेर :–** दिनांक २८/०५/२०२६ रोजी सावनेर पोलीसांना गोपनिय माहीती प्राप्त झाली की, **एका खाजगी बस मध्ये चार संशयीत इसम त्याच्या जवळील पिट्टु बॅग मध्ये गांजा घेवून जात आहे**. सावनेर पोलीसांना अशी माहीती प्राप्त होताच तात्काळ नमुद माहीती वरीष्ठ पोलीस अधिकारी यांना देवुन मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री सागर खर्डे, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर उपविभाग यांच्या मार्गदर्शनात सावनेर पोलीसांनी महामार्ग सुरक्षा पथकाचे पोलीस अधिकारी आणि अंमलदार यांच्या सह संयुक्त कारवाई केली. पोलीसांनी हेटी महामार्ग चौकी च्या समोर नाकाबंदी लावुन नागपुर कडुन येणाऱ्या वाहनांची तपासणी केली. सदर नाकाबंदी दरम्यान पोलीसांनी **बी. आर. ट्रॅव्हल्सची पंचासमक्ष तपासणी केली तसेच प्रवाशांची विचारपुस केली असता सिट क्रमांक १४, १५, ३२ व ३३ क्रमांकाच्या सिट वरील प्रवाशी संयशीत वाटल्याने त्यांना ताब्यात घेत चौकशी केली असता. आरोपी क्रं १) गणेश राधेचरण कुचमंदीये, वय २५ वर्ष, रा. वार्ड नं. ११, अर्जुननगर,अब्दुल्लागंज, आमोदा, जि. रायसेन, (मध्यप्रदेश) २) यश दिनेश यादव, वय १९ वर्ष रा. दुर्गा कॉलनी, सिहोर (मध्यप्रदेश) ३) राजेश पप्पु मेहरा, वय १९ वर्ष, रा. अर्जुन नगर, अब्दुल्लागंज, जि. रायसेन (मध्यप्रदेश) ४) तिलक ब्रिंद्रावन कुचमंदीये, वय १८ वर्ष, रा. अर्जुन नगर, अब्दुल्लागंज, औखेडी जि. रायसेन, (मध्यप्रदेश) असे नाव पोलीसांना समजले. पोलीसांनी सदर प्रवाशांच्या बॅग ची तपासणी केली असता त्यांच्या बॅग मध्ये गांजा मिळुन आला.**

**पोलीसांनी पंचासमक्ष नमुद आरोपीच्या ताब्यातुन २० किलो २४५ ग्रॅम अंमली पदार्थ गांजा किंमती ४,०४,९००/–रुपये , ५ मोबाईल, ४ बॅग आणि इतर साहीत्य असा एकुण ४,२४,६००/–रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नमुद प्रकरणी आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन सावनेर येथे कलम ८(क), २० (ब), (ii), (क), २२, २९**

एन.डि.पि.एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सर्व आरोपींना अटक करण्यात आली आहे.



कारवाई करणारे पोलीस पथक जप्त मुद्देमालासह

# अवैधरित्या प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची वाहतुक करणाऱ्या आरोपी विरूद्ध गुन्हा नोंद, आरोपी अटक
# २६ हजार ५०० रूपयांचा मुद्देमाल जप्त
# केळवद पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन केळवदः**— दिनांक २८/०५/२०२६ रोजी केळवद पोलीसांना गोपनिय माहिती मिळाली की, आरोपी नामे कैलाश बिपाती सुर्यवंशी रा चनकापुर, खापरखेडा, ता. सावनेर हा सौसंर ,राज्य मध्यप्रदेश येथुन विक्री करीता अवैधरित्या प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु आणत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा केळवद चेक पोस्ट येथे नाकाबंदी केली एका ऑटो मध्ये नमुद आरोपी हा इतर प्रवासांसह मिळुन आला. पोलीसांनी आरोपी जवळील बॅगची तपासणी केली असता महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला सुंगधीत तंबाखु मिळुन आला. नमुद आरोपीला ताब्यात घेत विचारपुस केली असता आरोपी हा लग्न समारंभासाठी सौंसर, राज्य मध्य प्रदेश येथे गेला होता तेथुन परत येताना विक्री साठी प्रतिबंधीत सुंगधित तंबाखु घेवुन आल्याची माहीती पोलीसांना प्राप्त झाली.

**पोलीसांनी पंचासमक्ष ३३ किलोग्रॅम प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु साठा किंमती १६,५०० /— रूपये आणि एक मोबाईल १०,०००/— रूपये असा एकुण २६,५०० /—रूपयांचा मुद्देमाल केला आहे. नमुद आरोपीने सदर प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु मानवी जिवीतास अपायकारक आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने त्याचे उप्तादन, विक्री, साठा तसेच वाहतुकीवर प्रतिबंध लावलेला आहे हे माहीती असतांना सुध्दा प्रतिबंधीत अन्नपदार्थाची विक्री करण्याच्या हेतुने साठा आणि वाहतुक केली आहे. नमुद आरोपी नामे कैलाश बिपाती सुर्यवंशी, वय ३६ वर्ष, रा. वार्ड क्रं ३, चनकापुर, खापरखेडा, ता. सावनेर, जि. नागपुर विरूद्ध पोलीस स्टेशन केळवद येथे भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम १२३, २७४, २७५, २२३ सह कलम अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे. नमुद आरोपीला अटक करण्यात आली आहे.**

मा. पोलीस अधिक्षक<br>
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर<br>
यांच्या मान्यतेने